
# सनविवि

मे
२०२०

महाराष्ट्र मंडळ बंगलोर



प्रकाशक :

महाराष्ट्र मंडळ, बंगळुरू
#२८, २ रा क्रॉस, गांधीनगर
बंगळुरू- ५६०००९
ई-मेल:
snvv.mmbangalore@gmail.com

संपादक मंडळ :

प्रवरा संदीप
सरोज कलंत्रे
धनंजय चौगुले
गौरी नातू
देवश्री अंभईकर धरणगांवकर
रेखा नाईक

तंत्र सहाय्य्य:

कैवल्य लिमये
संदीप लिमये

स्पष्टीकरण:

या अंकात प्रसिद्ध झालेल्या साहित्यात व्यक्त झालेले विचार व मते ही त्या त्या लेखकांची वैयक्तिक असून महाराष्ट्र मंडळ त्यास जबाबदार नाही. तसेच हे मासिक विक्रीसाठी नाही.

## अनुक्रमणिका

संवाद

मदतीसाठी आवाहन

घडामोडी

दारची फुले

# संवाद...

*नमस्कार मंडळी !!*
*घरीच आहात ना ??*
*म्हणजेच सुरक्षित आहात !!*
*यंदाचं महाराष्ट्र मंडळातील शताब्दी वर्षाचं भरगच्च कॅलेंडर . . . .*
*जानेवारी-फेब्रुवारीत झालेले दिमाखदार कार्यक्रम . . . . . . . .*
*गुढीपाडव्याच्या संस्थापक दिनाची केलेली जय्यत तयारी . . . .*
*आणि अचानक उद्भवलेलं हे कोरोनाचं*
*संकट . . . . .*
*काही गोष्टी आपल्या हातात नसतातच अन् त्यांच्याशी जुळवत जुळवतच पुढे जायचं असतं. असं जुळवताना जीविताचं मर्म पकडायचं असतं आणि हेच मर्म हायबरनेशन स्थितितील स्पंदन ठरतं!!*
*मित्रहो सोशल डिस्टन्सिंग असलं तरी डिजिटल डिस्टन्सिंग नाही आणि विशेषज्ञ आणि तंत्रज्ञान आपल्या हाताशी आहे , या दोन जमेच्या बाजूंचा विचार करूनच महाराष्ट्र मंडळाच्या कार्यकारिणीने शताब्दीच्या कॅलेंडर मधलं रिकामपण भरून काढायचं असं ठरवलं अन् त्याच साखळीतील पहिला कार्यक्रम दोन मे रोजी झाला . आपल्या सर्वांकडून त्या कार्यक्रमाला भरभरून प्रतिसाद मिळाला . अहो त्या कार्यक्रमाचे आतापर्यंतचे व्ह्यूज बघितले तर दहा हजाराच्या वर ती संख्या जाते !!*
*हा आकडा खरंच उत्साहवर्धक आहे आणि त्याच मुळे आता कुठलंही संकट समोर आलं तरी त्यावर काहीतरी मार्ग काढायचा आत्मविश्वास आणि निर्धार, दोन्हीही बळकट होण्यास मदत मिळाली आहे.*
*मंडळी महाराष्ट्र मंडळ म्हणून फक्त मनोरंजनात्मक प्रकल्पांच्या मागे न लागता आपण कोरोनाच्या या काळातील महत्वाची गरज म्हणून किंवा महत्त्वाची जबाबदारी म्हणून कोरोना-निधी जमा करण्याचा प्रस्ताव या सनविवि मध्ये मांडीत आहोत तरी सर्वांनी सामाजिक जबाबदारी ची जाणीव ठेऊन ह्या प्रकल्पासही योग्य तो प्रतिसाद द्यावा अशी विनंती .*
*आता ही परिस्थिती हळूहळू बदलायला लागली आहे तरीही सुरक्षिततेची चौकट लक्षात ठेवून, एकत्रित येऊन कार्यक्रम करण्याची संधी केव्हा घ्यायची हा निर्णय कार्यकारिणी योग्य वेळी घेईलच. तोपर्यंत आम्ही आणखी कशा पद्धतीने आणि कोणत्या कार्यक्रमांद्वारे आपल्यापर्यंत पोहोचता येतं त्याचे प्रयत्न सुरूच ठेवू आणि कार्यक्रमांची तपशीलवार माहिती आपल्याला मंडळाच्या फेसबुक पेजवर देत राहूच .. So, stay tuned ... पेजची लिंक खालील प्रमाणे...*

https://www.facebook.com/MMBlr.org/

*सर्वांनी काळजी घ्या आणि सुरक्षित रहा !!!*

*धन्यवाद...*
*महाराष्ट्र मंडळ, बंगलोर*

### *सूचना*

सर्व सभासदांना कळविण्यात येते की, सध्या चालू असलेल्या कोविड१९ च्या lockdown मुळे, महाराष्ट्र मंडळ बंगलोर च्या कार्यकारिणी ची वार्षिक सर्वसाधारण सभा घेणं शक्य झालेलं नाही. तरी पुढील परिस्थितीनुरूप पुढील तारीख ठरवली जाईल.

कार्यकारिणी,
महाराष्ट्र मंडळ, बंगलोर

# मदतीसाठी आवाहन...

स. न. वि. वि.

चीन मधून सुरु होऊन जगभर मोकाट सुटलेल्या COVID १९ ने जगभर सर्वांच्याच नाकात दम आणला आहे. LOCKOUT ने सर्वांनाच घरात कोंडून ठेवले आहे. आपल्या सारखे मध्यमवर्गीय--सुखवस्तू जन त्यामानाने घरात बसून व्यवस्थित दिवस काढत आहोत. मात्र ज्यांचे पोट हातावर आहे ते LOCKOUT मध्ये हतबल--अस्वस्थ झाले आहेत. दोन वेळा जेवण कुठे मिळेल हा प्रश्न त्यांच्या समोर आहे. काही ठिकाणी जमा झालेल्या गर्दीने त्याची थोडीशी झलक आपणास दाखविली आहे. सरकार/BBMP यांचे बरोबर सहकार्याने अनेक सामाजिक संस्था --Rotary , Lion , राऊंड टेबल, अगरवाल समाज, रास्वसं वगैरे --अशांना मदत करीत आहेत. आपणही ह्या प्रयत्नांना हातभार लावला पाहिजे.

३-४ जणांच्या कुटुंबाला १०-१२ दिवस पुरेल असे धान्याचे गाठोडे रु. ७५० चे आसपास देता येईल. त्यात गव्हाचे पीठ ३ किलो, तांदूळ ५ किलो, डाळ १ किलो , तेल १ किलो, मीठ, हळद सांबर पावडर असे सामान असते. एका HDPE बॅगमध्ये घालून वाटता येते. वरील पैकी एखाद्या संस्थेशी संलग्न होऊन ह्याचे वाटप करावे असा एक विचार आहे. आपण त्यासाठी हातभार लावाल अशी खात्री आहे.

२ कुटुंबं - रु १५००/-
५ कुटुंबं - रु ३७५०/-
१०कुटुंबं - रु ७५००/-
२० कुटुंबं - रु. १५,०००/-

आपण यथाशक्ती मदत कराल अशी खात्री आहे. वाटप होताना जर कोणाला जायची इच्छा असेल तर सहभागी होता येईल. अथवा आपण हे पैसे गरजूंना तयार जेवण देणाऱ्या संस्थेला देऊ शकू.

आपली बहुमूल्य मदत खालील GooglePay नंबर वर दि. १० मे २०२० पर्यंत जमा करावी ही विनंती.

Suchitra Khandekar - +91 84960 62850
Sujay Ghorpadkar - +91 98453 47646

**धनयवाद**

**Maharashtra Mandal Bengaluru**
**महाराष्ट्र मंडळ बेंगळूरू**

# घडामोडी...

## स्पंदन

*दि. २ मे रोजी सायंकाळी ५:३० वाजता मंडळाच्या फेसबुक पेज वर लाईव्ह होते*
*दिग्गज कलाकार सुबोध भावे, वैभव जोशी, स्पृहा जोशी, आर्या अंबेकर आणि पं शौनक अभिषेकी आणि*
*त्यांना ऐकत व मन भरून दाद देत होते.. बंगलोर चे मराठी रसिक...*






२ मे ला आम्ही, महाराष्ट्र मंडळ बंगलोरने फेसबुक लाईव्ह वरून आयोजित केलेला, एक अतिशय अनोखा व आल्हाददायक असा कार्यक्रम पाहिला. अत्यंत खेळीमेळीने सूत्रसंचालन करून सुबोध भावे ने सर्वांचे मन जिंकले. वैभव जोशीने कविता छान लिहिल्या अन् निवडल्या तर होत्याच, पण त्या उलगडूनही सुरेख सांगितल्या. गप्पांत रंग भरायला, स्वतःच्या काही कविता मांडायला स्पृहा जोशी असल्यावर हास्य-विनोदाला काय कमी? शौनक अभिषेकी हे जरी गायकीने खूप मोठे असले तरी त्यांचा प्रांजळ स्वभाव मनाला स्पर्शून गेला. सर्वात छोटी म्हणून केलेल्या गंमती- जमती मध्ये आर्या अंबेकरला पुन्हा एकदा आपण Little Champs च्या set वर आहोत असेच वाटले असेल. अनेक उत्स्फूर्त क्षणांनी कार्यक्रम खुलला होता. इतक्या आपुलकीचे, मैत्रीचे माहोल निर्माण झाले होते की दोन तास भुर्रकन उडून गेले आणि जाता-जाता खूप समृद्ध करून गेले.

**...अजिता पणशीकर**

नमस्कार
सध्याच्या परिस्थितीत शंभरी गाठलेल्या मंडळाने, नव्या तंत्रज्ञानाच्या साथीने केलेला ""स्पंदन" कार्यक्रम म्हणजे जुन्या नव्याची यथोचित आणि अप्रतिम सांगड. सरकारी नियमांचे पूर्णपणे पालन करत, आपल्या चोखंदळ मराठी रसिकांसाठी कालची संध्याकाळ , साहित्य , कलाविष्कार आणि संगीताची मेजवानी देणारी ठरली. एका पेक्षा एक दिग्गज भेटीला येणार म्हणून आम्ही ह्या कार्यक्रमाची चातकासारखी वाट बघत होतो . संध्याकाळी पाच वाजल्यापासूनच आम्ही लॅपटॉप ला चिकटून बसलो होतो.
कार्यक्रम सुरू झाला आणि सुबोध भावेंच्या अनौपचारिक गप्पामुळे एका खाजगी मैफिलीत बसल्याचा फील आला . चार गुणवान, हरहुन्नरी कलावंत आणि त्यांचा अष्टपैलू सूत्रधार हा एक सुरेख संयोग होता आणि पुढच्या सुंदर कार्यक्रमाची ती एक नांदीच ठरली.
वैभव आणि स्पृहा आवडत्या कवींपैकी, त्यामुळे आज ते काय सादर करतात ह्याची उत्सुकता होतीच. सुरुवात ह्या कवींना आवडणाऱ्या कवितांनी झाली आणि मैफिलीत रंग भरू लागला. गुलझार साहेबांच्या कवितेने एक परफेक्ट टोन सेट केला, आणि त्यानंतर ग्रेसांची उलगडून सांगितलेली "' शंभर लोकांना शंभर गावी घेऊन जाणारी" कविता निव्वळ आनंद देऊन गेली. नंतर स्पृहाने सादर केलेल्या पत्र , पैठणी आणि चाफ्याच्या झाडा ह्यांनी एकंदर कार्यक्रम वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवला. तिची दुर्योधना वरची कविता दाद घेऊन गेली.
सुबोध ने मत्स्यगांधेतला आणि कर्णाचा वाचलेला प्रवेश निव्वळ अप्रतिम , त्याअनुषंगाने शौनक अभिषेकींनी त्या नाटकाच्या सांगितलेल्या आठवणी, आणि महाराष्ट्र मंडळाशी असलेल्या ऋणानुबंधाबद्दल त्यांनी सांगितले .
आर्या ह्या सर्व कलाकार मंडळीत वयाने सर्वात लहान पण तयारीची गायिका . तिने अपेक्षेप्रमाणे "तुला पहाते रे " आणि "माझा होशील ना " ची शीर्षक गीते तर गायलीच पण "अवघा रंग एक झाला "कानांना मेजवानी ठरली. तिला लोकांनी केलेली "कितीदा नव्याने "ची फर्माईश तिने लगेच पूर्ण केली तेंव्हा मंडळात बसूनच कार्यक्रम पाहतो आहोत असे वाटून गेले. ह्या सर्वांवर कळस म्हणजे आर्याने सादर केलेले कन्नड गाणे .
वैभव जोशींची त्यांची नवीकोरी गझल ऐकवली ती आर्याने सुरात गुंफून दाखवली. कार्यक्रमाची सांगता शौनक अभिषेकींनीच्या "सर्वात्मका "ह्या भैरवीने झाली.
मराठी माणूस ज्या प्रांतात जातो त्या ठिकाणची भाषा आणि संस्कृतीही आपल्यात सामावून घेतो. तरीही आपल्या मूळ भाषेची अभिरुची तेवढीच टिकवून असतो. ह्याचे उत्तम उदाहरण म्हणजे आमचे बंगळुरुचे महाराष्ट्र मंडळ. हा कार्यक्रम आमच्या पर्यंत पोहोचवण्यासाठी मंडळातील सर्वांचेच आभार. असेच अनेकोअनेक उत्तमोत्तम व आखीवरेखीव कार्यक्रम आम्हाला बघायला मिळोत ही सदिच्छा.
यापुढे कुठलीही परिस्थिती येवो महाराष्ट्रमंडळ त्यातून वाट काढत आम्हला असेच दर्जेदार कार्यक्रम देणारच अशी खात्री आहेच.

**...पल्लवी आणि प्रसाद दाते**

# सुख म्हणजे नक्की काय असतं...

Lockdown. एक छोटा शब्द, पण ह्याने मंथन घडवले. घरी अडकल्याने सर्वजण हैराण झाले खरे, पण अर्धा ग्लास भरलेला पाहण्याची माणसाची शक्ति मात्र हा कोरोना खच्ची करु शकला नाही. कित्येकांचे कलागुण, आवडी निवडी, स्वप्ने आकार घेऊ लागली, साकार होऊ लागली, 'unlock' झाली. लोकांच्या सुखाच्या व्याख्या बदलल्या आणि प्रत्येकजण आयुष्याकडे नव्याने पाहू लागले.
हे क्षण कसे कायमचे टिपायचे, सर्वांच्या मनात कसे साठवायचे, हा विचार **मराठी मंडळ बंगळूरू साऊथ** मध्ये सुरू झाला. त्यातूनच "सुख म्हणजे नक्की काय असतं" ह्या short film ची संकल्पना जन्मली.
प्रसिद्ध ग्रीक फिलॉसॉफर Aristotle ह्यांनी "Man is a social animal" म्हंटले आहे ते उगीच नाही. आपल्या बंदिस्त जीवनात काय चाललंय हे इतरांना सांगितल्याशिवाय त्याची पूर्तता नाही. मेंबर्स ना तुमचा ३०-६० सेकंदाचा व्हिडिओ करा

म्हंटल्यावर उत्साहाची कारंजी उडू लागली. आनंदाचा, positivity चाच शिडकाव हवा एव्हढीच एक अट होती. २१ कुटुंबांनी व्हिडिओ बनवले आणि त्यांची एक सुंदर गुंफण केली गेली.
ह्या 'मराठी मंडळ बेंगळूरु साऊथच्या' फिल्म चा premier show मग डिजिटल सिनेमा हॉल (online conference platform) मध्ये सर्वांच्या उपस्थितीत release केला. तो तास खूप हसत, मजेत, गप्पात गेला.
एकमेकांना प्रोत्साहन देणारी ही फिल्म तुम्ही जरूर पहा. तुमच्या सुखात ही भर घालेल हे नक्की.

https://youtu.be/iTq7yYfrFwk

**...हेमांगी मुळे**

**"सुख म्हणजे नक्की काय असतं" हा उपक्रम जसा "मराठी मंडळ साऊथ बंगलोर" ने राबवला तसंच lockdown काळात बंगलोर मधील इतरही मराठी संस्था काही उपक्रम करत असतील तर सनविवि मध्ये माहिती जरूर द्यावी.**

## दारची फुले...

# *तेवढीच थोडी उघडीप...*

ड्रायव्हर : हम्मम .. काय नाई .. आत्ता कश्टमर आला .. हम्मम .. बाहेर पडलो गल्लीतनं .. आता फ्लायओव्हरला लागलोय
रवी : I can't believe it .. i am going there for work damm it .. not for fun .. how can u be so .. what .. what did u say .. hello .. hello .. shit .. excuse me .. तुम्ही फोन बंद करा .. प्लिज .. फोन बंद करा आधी .. ड्राइविंगकडे लक्ष द्या
ड्रायव्हर : ठेवतो रे .. काय नाय .. ते कश्टमर जरा .. लावतो फोन नंतरनं
रवी : काय बोलता रे तुम्ही .. तेच ते तेच ते तेच ते .. कस्टमरने बोलायचंच नाही का फोनवर .. idiots
ड्रायव्हर : ओ सायेब ठेवला ना फोन
ड्रायव्हर : सायेब, गानी लाऊ का ?
रवी : नको
ड्रायव्हर : सायेब, कुठं चाल्ला
रवी : दुबई
ड्रायव्हर : व्हय ! दुबईला सोनं स्वस्त असतं का ?
रवी : अरे .. तू .. तू शांतपणे गाडी चालव की .. उगाच वचवच
ड्रायव्हर : सायेब भ्या वाटती या शांतपनाची .. शांत राहिलं कीनी आतला .. मेंदूतला आवाज बोलाया लागतो .. तीन महिन्याचा म्येन्टेनन्स प्येन्डिंग हाये. आईचं ऑपेरेशनबी हाये .. उसनं पैसं म्येन्टेनन्सला देऊ का आईला प्रायव्हेट हॉस्पिटलात नेऊ .. बायको चार दिस बोलत न्हाइ हाये .. निस्तं खालमानी काम करतीये .. अचानक काय सांगल कुणास ठाऊक .. काल पोरानं गुटखा खाल्याला वास आल्ता .. असलं काय काय ऐकु यायला लागतं बघा .. म्हणुन सतत कानाला काहीतरी पायजे असतं .. आतल्या आवाजाच्या नरड्यावर पाय द्याया
रवी : मग .. BS VI गाड्यांचं पोल्युशन कमी असतं का
ड्रायव्हर : हां बघा सायेब .. असंच .. असंच करायचं .. मोकळं वाटतया .. तेवढीच थोडी उघडीप

**...ओंकार संगोराम**

# *निकष*

**सगळे निरोप घेऊन झालेत,**
**आवरून ठेवले आहेत नात्यांचे विस्तार**
**इकडच्या तिकडच्या account मधल्या रकमा गोळा करून**
**वाटून झाल्या आहेत**
**एखादा गंभीर निरोप,**
**एखादा सगळ्यावर कोटी करून हसून हसून डोळ्याच्या कडा ओला करणारा**
**बरेच क्षण संपूच नयेत असे वाटणारे, तिच्यासोबत**
**तिनं माझ्या छातीवर डोकं ठेवलेला, एखादा तिच्या केसात रेंगाळणारा,**

एखादा स्तब्ध, अबोल.  भैरवीच्या स्वरांसारखा वर्तुळाकार, स्वतःतच गुंतलेला
सगळे निरोप घेऊन झालेत··· . . . . .
पण पुन्हा ......
पुन्हा मोठ्ठा पसारा मांडून बसलो आहे
अचानक जाणवतंय स्वतःचं निर्मोहीपणाचं ढोंग
निर्णयापेक्षा त्यामागचे निकष ठरवणंच जास्त अवघड असतं
आता गोळा करत आणलेलं सगळं पुन्हा पसरत चाललंय
सगळ्या सुगंधी कुप्या, मखमली कापडातल्या पोथ्या,
बोहारणीला द्यायचे कपडे, प्रेमपत्रं, प्रशस्तीपत्रकं
फेकून द्यायच्या वस्तूंचा ढीग, अगदी स्मशानातली थडगी सुद्धा
सगळीच उलथापालथ,
उगाच काही तरी सांगितलं प्रेषितानं अगदी निघतांना
महाप्रवासाला निघण्या आधी म्हणे कुठल्याही दोन, फक्त दोन वस्तू घेता येतील म्हणून
नेमक्या कुठल्या दोन कविता घ्यायच्या हे ठरवणं वरकरणी किती सोप्पं वाटतं,
निर्णयापेक्षा त्यामागचे निकष ठरवणंच जास्त अवघड असतं!

...प्रमोद खाडिलकर

